कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना
टोल फ्री क्रमांक - 1064
कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

:: प्रेस नोट :: दिनांक :- 29.04.2021.

मौजे काजळा ता. बदनापुर जि.जालना येथील सरपंच यांचे पती व स्वत: ग्रामपंचायत सदस्य श्री. रंगनाथ सुभाष देवकाते यास पंतप्रधान आवास घरकुल योजनेचा हप्ता खात्यावर जमा करण्यासाठी 20,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने रंगहात पकडले.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | श्री. रंगनाथ सुभाष देवकाते, वय 32 वर्ष, ग्रामपंचायत सदस्य, मौजे काजळा ता. बदनापुर जि.जालना |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक 29.04.2021 रोजी ग्रामपंचायत कार्यालय मौजे काजळा ता. बदनापुर जि.जालना |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 20,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी दिनांक 22.03.2021 रोजी तक्रार दिली कि, तक्रारदार मौजे काजळा ता.बदनापुर जि.जालना येथील रहिवाशी असुन त्यांचे नावे पंतप्रधान आवास घरकुल योजने अंतर्गत 1,20,000/- रुपये मंजुर झाले असुन, त्यापैकी 15,000/- रुपयांची रक्कम त्यांचे खात्यावर जमा झालेली आहे, त्यांचा दुसरा हप्ता 45,000/- रुपयांचा त्यांचे खात्यावर टाकण्यासाठी नमुद मौजे काजळा ता. बदनापुर जि.जालना येथील सरपंचाचे पती ग्रामपंचायत सदस्य श्री. रंगनाथ सुभाष देवकाते यांनी 30,000/- रुपयांची लाचेची मागणी तक्रारदार यांचेकडे केली होती. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक 22.03.2021 रोजी लाचेची पडताळणी केली असता, तक्रारदार यांचेकडे ग्रामपंचायत सदस्य श्री. रंगनाथ सुभाष देवकाते यांनी पंतप्रधान आवास घरकुल योजने अंतर्गत दुसरा हप्ता 45,000/- रुपयांचा त्यांचे खात्यावर टाकण्यासाठी 30,000/- रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष केल्याचे निष्पण्ण झाले, आज दि. 29.04.2021 रोजी ग्रामपंचायत सदस्य श्री. रंगनाथ सुभाष देवकाते यांनी तक्रारदार यांचा पंतप्रधान आवास घरकुल योजने अंतर्गत दुसरा हप्ता 45,000/- रुपयांचा त्यांचे खात्यावर टाकण्यासाठी पहीला हप्ता म्हणुन 20,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष करुन स्विकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पथकाने ग्रामपंचायत कार्यालय, मौजे काजळा ता.बदनापुर जि.जालना येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

ईतर लोकसेवक श्री. रंगनाथ सुभाष देवकाते, वय 32 वर्ष, ग्रामपंचायत सदस्य, मौजे काजळा ता. बदनापुर जि.जालना यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच अँन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.